**प्रकरण पाच**

# मराठ्यांचा कर्नाटकातील साम्राज्य विस्ताराचा उद्योग

कर्नाटक म्हणजे कानडी भाषा बोलणाऱ्यांचा प्रदेश असा सर्वसाधारण अर्थ होतो. पण या शब्दांची व्याप्ती त्याहून मोठी होती. सतराव्या आणि अठराव्या शतकात या शब्दाची व्याप्ती त्याहून मोठी होती. सतराव्या आणि अठराव्या शतकात कर्नाटकाचे दोन भाग समजले जात होते. त्यांची हैद्राबादी कर्नाटक व विजापूरी कर्नाटक अशी नावे होती. या दोन भागांची सरहद्द पालार नदी समजली जात होती. या प्रत्येक भागाचे पुन्हा बालाघाट व पाईनघाट असे दोन भाग पाडले जात होते. म्हणजे संपूर्ण कर्नाटक प्रदेशाचे चार भाग पडत होते. हैद्राबादी बालाघाट, हैद्राबादी पाईनघाट, विजापूर बालाघाट व विजापूर पाईनघाट. मोगलांनी दक्षिणेतील प्रदेशाचे सहा सुभे फार दिवसांपासून पाडले होते. त्यापैकी हैद्राबाद व विजापूर हे प्रमुख होते.

प्राचीन काळात कर्नाटकात मोठमोठी हिंदू राज्ये होती. त्या राज्यांचा अस्त झाल्यावर त्यांच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक सत्ता बळकावून आपली संस्थाने स्थापन केली होती. या संस्थानिकांना कर्नाटकात पाळेगार किंवा नायक म्हणत.[१] हे पाळेगार जवळ जवळ स्वतंत्रच असते. त्यांच्यात एकी नसल्याने आपापसातील झगडे व लढाया ही नित्याची बाब असे. औरंगजेबाला सुध्दा या पाळेगारांचा नाश करता आला नाही. आदिलशाही व कुतुबशाही यांच्या आमदानीतच ते ह्या शाह्यांचे मांडलिक असत. त्यांच्यावर स्वाऱ्या करुनच खंडणी वसूल होई. मोगलांचे राज्य आले तेव्हाही मोगलांचा लष्करी जोर असला की नमते घेणे व जोर कमी झाला की त्यांच्या सत्तेला न जुमानणे हा पाळेगारांचा स्थायीभावच झाला होता. कर्नाटकात मुलकी व फौजदारी कामाकरिता मोगल बादशहाने जे अधिकारी नेमले होते तेच पुढे कर्नाटकाचे नबाब म्हणून प्रसिध्दीस आले. अर्काट, शिरे, काडापा व कर्नुल, सावनूर या ठिकाणच्या पाच नबाबांशी अठराव्या शतकात मराठ्यांचा संबंध आला. याशिवाय म्हैसूर, बिदनूर, चित्रदुर्ग, हरपनहल्ली, अनागोन्दी व रायदुर्ग ही संस्थाने कर्नाटकात आपल्या सत्ता टिकवून होते. तंजावरचे राज्य व मुरारराव घोरपडे यांचे गुत्तीचे संस्थान ही दोनच मराठी राज्ये कर्नाटकात होती.

## ५-i) शहाजीराजे भोसले यांची कर्नाटकातील कामगिरी –

छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे भोसले यांचा जन्म १५९४ साली झाला.[२] ऑक्टोबर १६२४ मध्ये निजामशाही विरुध्द मुघल बादशाही यांची जी इतिहास प्रसिध्द भातवडीची लढाई झाली, तीत निजामशाहीच्या बाजूने लढून आपल्या राजकीय कारकिर्दीस सुरुवात केली. भातवडीच्या लढाईत पराक्रम गाजवल्यामुळे निजामशाही दरबारात शहाजी राजांची प्रतिष्ठा वाढली. परंतु त्यांनी निजामशाहीचा त्याग करुन आदिलशाहीची वाट धरली. पुन्हा तिचा त्याग केला. व १६२८ मध्ये राजे पुन्हा निजामशाहीत दाखल झाले. अल्पावधीतच तेथील धोकादायक

राजकारणाला कंटाळून ते मोगल बादशाहीकडे ही गेले. व मोगलांची पाच हजारी मनसब स्विकारली. तथापी पुन्हा निजामशाहीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी ते प्रयत्नशील झाले. तो प्रयत्न करत असताना त्यांना आदिलशाही व मोगली फौजांच्या संयुक्त सेनेबरोबर लढत द्यावी लागली. ऑक्टोबर १६३६ मध्ये त्यांना तर मोगलांना शरण जाणे भाग पडले. ते निजामशहासह मोगलांना शरण गेले. शहाजीच्या या कारस्थानावर भाष्य करताना प्रा.जयसिंगराव पवार म्हणतात,''राजकारणात मराठा सरदाराने केलेले हे अभूतपूर्व असे धाडस होते. त्याचा शेवट जरी यशस्वी झाला नसला तरी मराठ्यांच्या दृष्टीने ते धाडस अपूर्व होते.[३] त्यानंतर शहाजी राजांनी आदिलशाहीची चाकरी स्वीकारली. आदिलशहाने त्यांना बारा हजारी मनसबदारी दिली. तसेच त्यांच्याकडे पुणे सुपेची जहागीर कायम राखली. शहाजीसारखा खटपटी व सामर्थ्यशाली सरदार महाराष्ट्रात मोगल व आदिलशाही यांच्या सीमेवर ठेवण्यापेक्षा त्यास कर्नाटकात दूरच्या कामगिरीवर पाठविण्याचे आदिलशहाने ठरविले. कर्नाटकात दूरवर शहाजीराजांना पाठविण्याचा आदिलशहाचा हेतू काही का असेना पण पुढे त्यामुळे त्याचा दक्षिणेकडील मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराला शहाजीराजांचे कर्नाटकात जाणे हितकारकच ठरले याबद्दल दुमत असू नये.

कर्नाटकात जाण्यापूर्वी शहाजी राजांनी आपल्या पुण्याच्या जहागिरीची चांगली व्यवस्था केली. आपली पत्नी जिजाबाई व पुत्र शिवाजी राजे यांना पुणे येथे ठेवण्याचा त्यांनी निर्णय घेतला. व जहागिरीच्या कारभारीपणावर दादोजी कोंडदेव या अत्यंत विश्वासू व अनुभवी मराठ्याची नेमणूक केली. तसेच जाताना आपला सरंजामही त्यांनी पुणे जहागिरीत ठेऊन दिला.

शहाजीच्या कर्नाटक स्वारीच्या वेळेस कर्नाटकात विजय नगरचा वंशज पेनुकोंड्याचा श्रीरंगराय, इक्केरीचा वीरभद्र, श्रीरंगपट्टणचा कांतिराय, तंजावरचा विजय राघव राय, जिंजीचा व्यंकट नायक इ. अनेक हिंदू राजे राज्य करीत होते. तथापी एकजुटीने मुसलमानी आक्रमणास विरोध करण्याचा विचार कोणास सुचला नाही.

**<u>शहाजीच्या तीन स्वाऱ्या - बंगलोरास वास्तव्य (१६३७-४०) -</u>**

१६३७-४० ह्या काळात आदीलशाही सरदार रणदुल्लाखान व शहाजी राजे यांनी कर्नाटकात तीन स्वाऱ्या पार पाडल्या. पहिल्या स्वारीत त्याने इक्केरीच्या नायकाचा पराभव करुन त्याचे अर्धे राज्य व १८ लाख होनांची खंडणी घेतली. दुसरी स्वारी शिरे येथे केली. त्या स्वारीत शहाजीराजे रणदुल्लाखान व अफजलखान एकत्र होते. त्या स्वारीत कस्तुरीरंग या नायकाचा अफजलखानाने विश्वासघात करुन शिरच्छेद केला.

दरम्यान शहाजीराजांनी बंगलोर हस्तगत केले. शहाजीची नेमणूक बंगलोरवर करण्यात आली.

रणदुल्लाखानाची तिसरी स्वारी १६३९-४० मध्ये झाली. या स्वारीत त्याने बसवापट्टणचा केंगनायक याचा पाडाव केला. बसवापट्टणच्या स्वारीत शहाजीराजे यांनी मोठा पराक्रम केला.

या स्वाऱ्यांत यश मिळाल्याने आपण तीन वर्षात काफरांचे निर्मुलन केल्याचा आनंद महंमदशहास झाला.

तथापी शहाजील‍ शक्य तितका खुष ठेवण्याचाही त्याने प्रयत्न केला.

रणदुल्लाखान दरबारात परत आल्यानंतर शहाजीच कर्नाटकात आदीलशहाचा मुख्य हस्तक म्हणून वावरु लागला. त्याने तिकडे लोकांचे प्रेम संपादन केले व नियमित वसूलही गोळा केला. वेळेवर रकमा तो विजापूरास पाठवित असल्याने शहास त्याचा कारभार चांगलाच पसंत पडला. कोणाही मुसलमान सरदाराकडून पुर्वी प्रांताची सुव्यवस्था इतकी चांगली लागली नव्हती.

शहाजी बंगलोरास राहून सर्व कारभार पहात होता. आपल्या हातून हिंदूंचा नि:पात होतो हे या उद्योगाचे खरे मर्म त्याने ओळखले होते. हिंदू सत्ताधिशांचे वकील त्याच्याकडे जाऊ-येऊ लागले होते. केव्हा उघड वाटाघाटी तर केव्हा गुप्त कावे त्यांचे सारखे चालू होते. दक्षिणेतील हिंदूंचा पुरस्कार त्यांजकडे येऊन त्याने स्वतंत्र राजाचा थाट जमविला होता. त्यामुळेच बंगलोरला हिंदू राज्य उत्पन्न झाल्याचा देखावा चालू झाला.[४]

इ.स.१६४३ साली मे ते जुलैच्या दरम्यान रणदुल्लाखान मरण पावला. त्याच्या जागी आदीलशहाने त्याचा जावई मुस्तफाखान याची नेमणूक केली.[५]

इ.स.१६४६-४७ मध्ये शहाजीराजे व मुस्तफाखान यांनी बंगलोरच्या श्रीरंगराया बरोबर लढाई देवून श्रीरंगरायाची फौज उधळून लावली आणि वेलोर हस्तगत केले. या विजयानंतर मुस्तफाखान ज्यावेळेस विजापूरला परतला, त्यावेळेस महंमद शहा मुद्दाम चाळीस मैलावर अलीकडे येऊन त्याने मुस्तफाखानचा गौरव केला.

शहाजीच्या पराक्रमबद्दल शहाने महाराजांनाही महाराज फर्जंद शहाजीराजे भोसले या शब्दांनी सन्मानीत केले.

याच युध्द प्रसंगात (वेलोरच्या) शहाजी व मुस्ताफाखान यांचे वैमनस्य प्रथम उद्‌भवले. शहाजी हिंदूचा पुरस्कार करतो अशी सामान्यत: दरबाराची समजूत झाली तर शहाजीस हिंदूधर्माच्या नाशास आपण कारण व्हावे ही गोष्ट बिलकुल रुचली नाही. रियासतकार लिहितात एकदंर शहाजीची अवस्था इकडे आड तिकडे विहिर अशी झाली.[६]

इ.स.१६४८ साली मुस्तफाखान व शहाजी राजे यानी रुपनायकाच्या जिंजीच्या किल्ल्यास वेढा घातला. याच वेढ्याच्या प्रसंगी गोवळकोंड्याच्या कुतुबशाहाशी आतून संधान बांधले. म्हणून शहाजी राजांस अटक केले, २५-७-१६४८ शहाजीच्या अटकेविषयी ग.ह.खरे म्हणतात जिंजीच्या नायकांचा किंवा पालेगारांचा घरोबा होता म्हणून ही अटक झाली.[७] तर वा.सी.बेंद्रे शहाजीच्या अटकेविषयी लिहितात शहाजीवर हिंदू नायकांचा भर होता व ते त्याच्या भरवाशावर आदीलशाही सरदारांची भिती धरीत नव्हते. ऐन संकटाचे प्रसंगी शहाजीने नबाबास शत्रुच्या तोंडी देऊन निघून जाणे याचाच अर्थ असा की, हिंदू राजे त्यावेळी नबाबाचा पूर्ण पाडाव करण्यास समर्थ हाती. शिवाय त्यास मीर जुमल्याची चोरुन मदत होतीच. सारांश, हिंदुराज्ये बुडविण्याच्या यावनी बेतास कायमचा धक्का देण्यासारखे वर्तन होते, परंतु नबाबाने शहाजीवर मात केली आणि आदिलशहाची संमत्ती मिळवून त्यास शहाजीच्या हिंदु व भाऊबंद शत्रुच्याच सहाय्याने अचानक घाला घालून कैद केले.[८]

शहाजी राजांना विजापूरला आणण्यासाठी अफझलखान या सरदाराची खास नेमणूक झाली. ९-११-१६४८ रोजी मुस्तफाखान मरण पावला व त्याच्या ठिकाणी वजीरखान महंमदाची नेमणूक झाली. त्याने वेढ्याचे काम अंगावर घेऊन २८-१२-१६४८ रोजी जिंजीचा किल्ला हस्तगत केला. त्यात त्याला २० कोट रुपयांची मत्ता मिळाली ती सर्व संपत्ती ८९ हत्तींवर लादून शहाजीस बंदोबस्तात घेऊन अफझलखान जिंजीहून निघाला, तो सन १६४९ च्या उन्हाळ्यात विजापूरास पोहोचला.

शहाजीला कैद केल्याबरोबर बंगलोर व कोंढाणा हस्तगत करण्यासाठी फौजा रवाना केल्या. कर्नाटकात शहाजीपुत्र संभाजीराजे आणि महाराष्ट्रात शिवाजीराजे यांनी मोठ्या पराक्रमाने या फौजा परतवून लावल्या.

अशाप्रकारे शहाजी महाराजांच्या जहागिऱ्या जप्त करण्यात शहाला अपयश आले. याच वेळी शिवाजी महाराजांनी आपल्या पित्याची सुटका करण्यासाठी मोगल सुभेदार शहाजाद मुरादबक्ष यांचेही दडपण आदिलशहावर आणण्याचा प्रयत्न केला. मुरादने चांगला प्रतिसाद दिला. शहाजी महाराजांची १६-५-१६४९ रोजी सन्मानपूर्वक सुटका करुन त्यांना कर्नाटकात कामगिरीवर पाठविले. बेंद्रे म्हणतात, शहाजी महाराजांची सुटका म्हणजे आदिलशहाच्या कृपेचे किंवा दयेचे प्रतिक नसून ही सुटका मोगली व इतर दडपणामुळे झाली होती.[९] प्रा.जयसिंगराव पवार या सुटकेवर भाष्य करताना म्हणतात, ''मोगली दडपणापेक्षा शहाजी राजांच्या उभय पुत्रांच्या पराक्रमामुळेच त्यांची सुटका झाली असे म्हणावे लागेल.[१०] या सर्व प्रकरणात तडजोड म्हणून शिवाजी राजांना अत्यंत प्रिय असणारा कोंढाणा किल्ला आदिलशहाला द्यावा लागला.

कैदेतून सुटका झाल्यानंतर कर्नाटकातील रायचूर दुआबातील कनकगिरी प्रदेशात बरीच वर्षे शहाजीराजांनी व त्यांचे पुत्र संभाजी राजे यांनी वास्तव्य केले. याच सुमारास आदिलशाही व कुतुबशाही यांच्यामध्ये कर्नाटकातील प्रदेशासंबंधी युध्द सुरु झाले. (सन १६५१) या युध्दात आदिलशाहीच्या बाजूने शहाजीने पराक्रम गाजविला. मीर जुम्ला याच्याशी लढून त्याचा धुव्वा उडविला आणि दंड म्हणून नऊ लाख होनांचा दंड वसूल केला. या घटनेमुळे आदिलशहाच्या दरबारात शहाजी महाराजांचे वजन वाढले.

सन १६५४ च्या वर्षी कनकगीरीचा पालेगार आपाखान याने बंडखोरी केली म्हणून त्याचे पारिपत्य करण्यासाठी शहाने अफझलखान व संभाजीस पाठविले. त्या लढाईत संभाजीस पुढे करुन खानाने मारले. हे वर्तमान कळताचा शहाजीने त्वेषाने लढून पालेगारास जिंकले. अफझलखानाने संभाजीस लढाईत पुढे करुन मागून त्याचा पाठपुरावा केला नाही. म्हणून शहाजीस खानाचा भारी राग आला. आणि शिवाजीच्या मनातही हे वैषम्य कायम राहिले. (याच खानास शिवाजीने १६५९ मध्ये यमसदनास पाठविले)

महंमद आदिलशहा दिवसेंदिवस क्षीण होत जाऊन शेवटी ४-११-१६५६ रोजी मरण पावला. व त्याच्या गादीवर त्याचा पुत्र आली आदिलशहा हा बसला. तो अल्पवयीन असल्याने राज्याचा कारभार त्याची माता बडी साहीबा पाहू लागली. तेव्हा दरबारात साहजिकच कारस्थानांचे राजकारण सुरु झाले. शहाजीचा आदिलशाही

दरबारातील पुरस्कर्ता वजीरखान महंमद ११-११-१६५७ रोजी मारला गेला. शहाजीवरही याचा परिणाम झाला तथापी त्याने आदिलशाही दरबाराला तंबी दिली परिणामी आदिलशाही दरबार शहाजी राजांशी सरळ वागू लागला.

सन १६५८ मध्ये शहाजीने कनक गिरीच्या पूर्वेस असलेल्या श्रीशैल मल्लिकार्जुन हस्तगत करण्यास व्यंकोजीस पाठविले. १६५९ मध्ये स्वत: तंजावरवर चालून गेला पण तेथील नाईकाने त्यास मुळीच दाद दिली नाही. तेव्हा शहाजी त्रिचनापल्लीवर गेला. पण तेही ठिकाण त्यास मिळाले नाही. सन १६६१ मध्ये मदुरा, जिंजी व तंजावर येथील नाईकांनी एकजूट करुन शहाजीच्या आक्रमणास विरोध केला. परिणामी तंजावर काही त्याला हस्तगत करता आले नाही. तथापी १६७४ त रायगडावर शिवाजीने आपणास राज्याभिषेक करुन घेतला त्याच सुमारास एकोजीने तंजावरचा ताबा घेतला व तेथे स्वतंत्र राज्य स्थापीले. रियासतकार लिहितात, मिळून, जो स्वतंत्रतेचा प्रयोग खुद्द शहाजीला साधला नाही तो त्याच्या दोघा पुत्रांनी पुढे यथावकाश आपापल्या क्षेत्रात सिध्द करुन दाखविला.[११] सन १६६१-६२ च्या पूर्वीच शहाजी व त्याचे पुत्र आपणांस भारी आहेत अशी आदिलशाही दरबारची खात्री होऊन चुकली होती. प.महाराष्ट्रातून तर शिवाजीने आदिलशाही अंमल पार उठवून दिला. आणि कर्नाटकात शहाजी व एकोजी तसेच करणार असा अंदाज दिसू लागला. अशा परिस्थितीत वेळेवर शहाजीला आळा घालता आला तर पहावा, अशा इराद्याने बरोबर मोठी फौज घेऊन अली आदीलशहाने प.कर्नाटकात स्वारी केली आणि एप्रिल १६६३ मध्ये तो बंकापुरास गेला. आणि शहाजीस निकडीची बोलावणी करुन आपल्याकडे आणले आणि जवळ येताच त्याच्या पायात बेड्या ठोकल्या. याप्रमाणे शहाजीस दुसऱ्यांदा कैद भोगण्याची पाळी आली. परंतु यावेळी त्यास फार वेळ कुचंबत रहावे लागले नाही. दोन दिवसात त्याची सुटका झाली आणि आदिलशहाने त्यास बेदनूरच्या कामगिरीवर पाठविले.

**<u>बेदनूरचे स्वारीत मृत्यू –</u>**

बेदनूरचा नाईक आदिलशाहीचा ताबेदार होता. तो स्वतंत्रपणे वागू लागला होता. तेव्हा त्याला वठणीवर आणण्यासाठी शहाजीला पाठविण्यात आले. शहाजीने नाईकचा पराभव करुन त्याला शरण आणले. आदिलशहाने मानमरातबाची पत्रे, वस्त्रे, भूषण, हत्ती,घोडे वगैरे पाठवून शहाजीचा गौरव केला. शहाजीराजे बेदनूरच्या स्वारीतून परत येताना होडिकरी या गावी मुक्कामास होते. तेथे घोड्यावरुन पडून दि. २३-१-१६६४ रोजी मरण पावले.[१२] आदिलशहाने मनसबदारीची वस्त्रे एकोजीस दिली. डॉ.प्र.न.देशपांडे यांच्या मतानुसार एकोजीला एकट्यालाचा मनसबदारी देण्यामागे शहाजीच्या मृत्यूनंतर व्यंकोजीने शिवाजीच्या स्वराज्य कार्यात सहभागी होऊ नये व आपल्या चाकरीत रहावे यासाठी आदिलशहाने ही साखरपेरणी केली असली पाहिजे.[१३] आदिलशहाच्या या साखरपेरणीला व्यंकोजी बळी पडला असेच म्हणावे लागते. म्हणूनच पुढे १६७७-७८ मध्ये शिवाजी महाराजांना भावावरच स्वारी करावी लागली.

मराठ्यांच्या इतिहासात शहाजीराजांचे कार्य काय? हा आतापर्यंत अनेक इतिहासकारांच्या चिंतनाचा विषय

झालेला आहे. परंतु या प्रकरणापुरते पाहावयाचे तर मराठ्यांचा पुढे दक्षिणेकडे विशेषत: कर्नाटकात जो साम्राज्य विस्तार झाला त्याचा पाया शहाजीनेच घातला असेच म्हणावे लागते. भले तो आदिलशहाचा चाकर म्हणूनच पराक्रम गाजवत असेल पण बंगलोरची जहागिरी त्यांना मिळाल्यावर त्यांनी त्या शहाराची वाढ केली. कर्नाटकात त्याने प्रजेच्या कल्याणाच्या अनेक योजना आखल्या व प्रजेचे कल्याण हा राज्यकर्त्यांचे अंतिम ध्येय असले पाहिजे, हा आदर्श शहाजी राजांनी घालून दिला.

शिवाजीने महाराष्ट्रात स्वराज्य निर्मिती केली. पण शहाजीला बृहन्महाराष्ट्राचा संस्थापक मानला पाहिजे. कर्नाटकात त्याने महाराष्ट्रीय संस्कृतीचा प्रसार व विकास केला यातही वाद होता कामा नये. आजही महाराष्ट्राबाहेर कर्नाटकात ब्राम्हण, क्षत्रिय कारागीर वगैरे नानाविध कुटुंबे दृष्टीस पडतात. ती आरंभी शहाजीच्या वेळेस तिकडे गेली.[१४] आदिलशाहीची चाकरी करत असताना कर्नाटकातील नायकांच्या कडून त्याने खंडण्या वसूल केल्या पण एकूणच त्याने कर्नाटकातील नायकांसंदर्भात उदार धोरण आखले होते. हे सर्व करत असताना त्याने विद्या व कलांना आश्रय देऊन हिंदू संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या दरबारात सुमारे ७५ शास्त्री, कवी, पंडित होते. शहाजी महाराज स्वत: अनेक भाषाभिज्ञ असून ते विद्वज्जनांचा परामर्ष घेत. हिंदू संस्कृतीचा व साहित्याचा होत असलेला ऱ्हास थांबवून त्यांनी त्यात जिवंतपणा आणण्याचा प्रयत्न केला.[१५]

या पार्श्वभूमीवरच रियासतकार लिहितात. ''तात्कालिन ऐतिहासीक व्यक्तीत राष्ट्रीय स्वत्व दिमाखाने मिरविणारा शहाजीशिवाय दुसरा एकही हिंदु सत्ताधीश दक्षिणेत आढळत नाही. म्हणून शिवाजीला जन्म देऊन त्याचे ठिकाणी स्वातंत्र्याचे वारे उत्पन्न करण्याचे श्रेय त्याला अवश्य मिळते. या दृष्टीने शिवाजीला जर ''राज्य संस्थापक'' म्हणावयाचे तर शहाजीला राज्य संकल्पक असे पद देण्यास हरकत नाही.[१६] शिवाजीच्या स्वराज्य स्थापनेचे श्रेय शिवाजीचे असले तरी मूळ कल्पना शहाजीची असल्याचे राजवाड्यांनी स्पष्ट म्हटले आहे.[१७] तथापी स्वराज्य स्थापनेचे सर्व श्रेय शिवाजीलाच असे म्हणणारे इतिहासकारही आहेतच. त्यात सेतुमाधवराव पगडी, न.र.फाटक, सदाशिव आठवले इ. मोडतात. परंतु कर्नाटकात मराठी साम्राज्य व संस्कृती पोहचविण्याची कामगिरी शहाजी महाराजांनीच केली यात वाद असता कामा नये.

या दृष्टीने रियासतकारांचे म्हणणे लक्षात घेण्याजोगे आहे. ते लिहितात, विद्येची आवड तंजावरचे राज्यात आनुवंशिक परंपरेन उत्तरोत्तर वाढत गेली. आणि शेकडो ग्रंथ निर्माण होऊन अनेक विद्वानांना राजाश्रय मिळाला, तो प्रकार महाराष्ट्रातील श्रावणमास दक्षिणेलाही साध्य झाला नाही. एका दृष्टीने शहाजीने निर्माण केलेली प्राचीन संस्कृतीची आवड आजसुध्दा बंगलोर तंजावरकडे टिकलेली दिसते, तितकी महाराष्ट्रात दिसत नाही. ही गोष्ट शहाजीची योग्यता ठरवताना अवश्य ध्यानात ठेवली पाहिजे.[१८]

५-ii) **छत्रपती शिवाजी महाराज आणि कर्नाटक -**

छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्नाटकातील मराठ्यांच्या सत्ता विस्ताराचे उद्योग राज्याभिषेकानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी कर्नाटक स्वारी हाती घेतली व तीत त्यांनी यश मिळविले. महाराजांनी १६७४ मध्ये राज्याभिषेक करवून घेऊन स्वतंत्र राज्याचा पुकारा केला होता. तथापी त्याचे राज्य फारच छोटे होते. तेव्हा ते वाढविण्यासाठी महाराजांनी कर्नाटक स्वारी १६७६-७७ मध्ये हाती घेतली असण्याची शक्यता आहे. रियासतकारांनी अशा आशयाचे मत मांडल्याचे आढळते. सरदेसाई लिहितात ,''हा नवीन उपक्रम अंगिकारण्यास आणखीएक विशीष्ठ कारण घडले ते ऐतिहासिक दृष्ट्या प्रत्यक्ष घडले नसले, तरी लोक चर्चेत अविष्कृत होते. ते असे की, शिवाजीने मोठ मोठे किताब धारण केले तरी त्याचे राज्य महाराष्ट्राच्या टीचभर भूमीपलिकडे नव्हते. शिवाय शिवाजीला इतर कोणी हिणवित म्हणून या हिणवणीस जबाब म्हणून शिवाजीने द.दिग्वीजयाचे काम हाती घेतले.[१९]

शिवाजीने कर्नाटक स्वारी का हाती घेतली याची चर्चा सरदेसाई प्रमाणेच सरकार, शेजवलकर, बेंद्रे, पगडी, मुद्दाचारी इत्यादी आधुनिक इतिहासकारांनी केलेली आढळते.

सरकार सुरत प्रकरणासारखेच याही घटनेकडे बघतात. ते म्हणतात लूट मिळविणे हाच शिवाजीचा या स्वारीमागचा उद्देश होता. त्यांच्याच शब्दात बोलावयाचे झाल्यास "But gold and not land used his chief objects"[२०]

शेजवलकरांच्या मते या विजयनगरच्या हिंदू राज्याचे पुनरुज्जीवन करुन दक्षिणेतील नायकांना भोसल्याच्या राज्यात सामील करणे ते काम व्यंकोजीने केले नाही म्हणून शिवाजीने कर्नाटक स्वारी हाती घेतली.[२१]

पगडींच्या मते दक्षिण दिग्वीजय हाच शिवाजी महाराजांच्या कर्नाटक स्वारीचा हेतू होता. हे स्पष्ट करताना ते लिहितात,''शिवाजीने या स्वारीत विजापूरकरांचा दहा हजार चौरस मैलांचा जिंजी, वेलोर हा प्रदेश कायमचा आपल्या ताब्यात आणला यावरुन विजापूर राज्याचा तो भाग जिंकून घेणे हे शिवाजीचे उद्दीष्ट होते हे स्पष्ट होते.[२२]

डॉ.बी.मुद्दाचारी यांच्या मते सन १६७५ मध्ये व्यंकोजीने आपली राजधानी बंगलोरहून तंजावरला हलविली हे काही शहाणपणाचे धोरण नव्हते. त्यामुळे म्हैसूरच्या नायकाला तेथे हातपाय पसरण्याची संधी मिळणार होती.[२३]

शिवाजीला कर्नाटकातील वडिलांच्या जहागिरीतील अर्धा वाटा हवा होता. पण शहाजीच्या मृत्यूनंतर बारा तेरा वर्षे झाली तरी व्यंकोजीने ती दिली नाही. महाराजांनी व्यंकोजीला लिहीले, अधर्मे करुन तेरा वर्षे आपण सारे राज्य खादले. आता अर्धा वाटा मागतात तो त्यांचा त्यास द्यावा आणि आपण सुखी व्हावे ऐसा विचार (तुम्ही) करावा होता''.[२४]

व्यंकोजीने महाराजांना काहीच दिले नाही. तेव्हा त्याला वठणीवर आणण्यासाठीही महाराजांनी कर्नाटक मोहिम काढली असली पाहिजे, हे वरील पत्रावरुन स्पष्ट होते. वा.सी.बेंद्रे यांच्या मतानुसार आदिलशाही प्रथम उलथून पाडावयाची व खालून आदिलशहा यांच्या मान्यात दोन्हीकडे अवधान ठेऊन राजकारण साधावे लागत होते, ती

अडचण दूर करण्यासाठी खालून मारा करणाऱ्या शत्रुला कायमचे लंगडे करुन टाकून नंतर उत्तर हिंदुस्थानातून येणाऱ्या मोगलांची खाली उतरण्याची वाटच बंद करावी हे या मोहिमेतील राजकारण होते.'' [२५]

भविष्यकाळातील संकटावर मात करण्याची तरतूद म्हणून महाराजांनी कर्नाटक मोहिम हाती घेतली असावी असे डॉ.जयसिंगराव पवार यांना वाटते.[२६] व राजारामाने पुढे मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दाच्या वेळेस जिंजीचा आश्रय घेतला त्यामुळे महाराजांची या मोहिमेमागे दूरदृष्टी होती हे स्पष्ट होते असेही ते म्हणतात. पुढील ऐतिहासिक घटना बघता डॉ.पवारांचे मत मान्य करावयास हरकत नाही. शिवाजी महाराजांना संभाजी (१६५७) व राजाराम (१६७०) असे दोन पुत्रहोते. दोघांना दोन जहागिऱ्या असाव्यात असे वडील म्हणून कदाचित त्यांना वाटत असावे व तशी दुसरी जहागिरी निर्माण करण्यासाठी महाराजांनी ही कर्नाटक स्वारी हाती घेतली असण्याची शक्यता सभासद बखरीतील महाराजांच्या तोंडी घातलेल्या वाक्यावरुन वर्तवावयास हरकत नसावी. सभासद लिहितो ,''आपले पुत्र दोघे जण एक तू संभाजी व दुसरा राजाराम ऐसियास हे सर्व राज्य आहे. यास दोन विभाग करतो. त्यास तू वडील पुत्र तुजला कर्नाटकाचे राज्य दिधले. इकडील राज्य राजारामास देतो. तुम्ही दोघे पुत्र दोन राज्य करणे.''[२७]

याचा अर्थ शिवाजी महाराजांनी कोणत्याही एका कारणासाठी कर्नाटक हाती घेतली असे नाही तर वरील विविध उद्देश त्यापाठीमागे होते.

शिवाजी महाराजांनी १६७७-७८ मध्ये हाती घेतलेली ही स्वारी त्यांच्या व मराठा साम्राज्याच्या दृष्टीनेही उपकारक ठरली. तथापी महाराजांनी केवळ एकच स्वारी कर्नाटकावर केली असे नाही तर १६७७-७८ ची ही स्वारी महाराजांची तिसरी स्वारी होय. फारतर राज्याभिषेकानंतरची ही पहिली स्वारी म्हणता येईल. पण महाराजांनी अफझलखान वधापूर्वीही (१०-११-१३५९) एक स्वारी कर्नाटकावर केली होती. ४-११-१६५६ ते ५-१-१६५७ या दरम्यान केव्हातरी शिवाजी महाराजांच्या सैन्याने कर्नाटकात धारवाड जिल्हा व म्हैसूर संस्थान यांच्या सरहद्दीवर असलेल्या मासूर गावापर्यंत धडक मारली.होती. पण ह्या स्वारीत शिवाजी महाराजांच्या सैन्याचा पराभव होऊन त्यांस माघार घ्यावी लागली होती.

१६५७ नंतर १६५८ मध्ये महाराज कर्नाटकात स्वारीवर गेले होते. १-१०-१६५८ च्या एका शिवाकालीन पत्राचा आधार त्याच्यासाठी घेता येतो. त्या पत्रात एका शिवेच्या वादामध्ये दिव्याचा निर्णय घेतला असता दिव्य करण्याचे नाकारले, अशी फिर्याद घेऊन एक पक्ष पुरंदरास शिवाजी महाराजांकडे आला व त्याने आपली फिर्याद गुदरली. फिर्यादीचे काम पुढे चालवावयाचे तो '' साहेब करणाटक, प्रांती गेले त्या प्रांतीहून आलियावर जो निवाडा करणे तो करतील तो परियंत''[२८] असे नमूद केले आहे. शिवाजी महाराज कर्नाटकात गेले असल्यामुळे आदिलशहाने अफझलखानास त्याचा बंदोबस्त करण्यासाठी तिकडे पाठविले होते. खरे, ग.ह. यांच्या मतानुसार कदाचित हा महाराजांचा शहाजीच्या म्हैसूर संस्थानातील बसवापट्टण वगैरे भागात असलेल्या जागीरीशी संबंध जोडण्याचा प्रयत्न असावा.[२९]

**रघुनाथपंत हणमंतेची कामगिरी -**

रघुनाथ पंडित हा नारो मिमण हणमंते या शहाजी राजांच्या सेवकाचा पुत्र. रघुनाथ पंडित शहाजीच्या पश्चातही कर्नाटकातच राहिला. शहाजी पुत्र एकोजी याचा तेथे बस्तान बसविण्यात रघुनाथ पंत हणमंते प्रमुख होता. तथापी पुढे त्यांचे पटेनासे झाले. तेव्हा पंताने व्यंकोजीस दटावले,''आमची बरदास्त दुसरे ठिकाणी होणार नाही असे आपण म्हणाल तर आज्ञा द्यावी, प्रत्यक्ष दाखवू''. व्यंकोजीनेही पंतास रजा दिली. पंत काशी यात्रेचे निमित्त करुन बाहेर पडला तो विजापूरास आला. तेथे स्थिर न होता कुतुबशहाच्या दरबारात गेला. कुतुबशहाचा कारभार मादण्णापंत शहाणपणाने हाकत आहे. तर आपण शिवाजीकडे जाऊन त्यास घेऊन कर्नाटकात यावे आणि सर्वत्र एकछत्री मराठ्यांचे राज्य चालू करावे असा विचार करुन मादण्णास भेटला. दरबारात त्याचे (कुतुबशहाच्या) शहा व मादण्णाकडून चांगले स्वागत झाले. तेथेच विजापूरी कर्नाटक जिंकण्यास शिवाजीराजांनी मोहीम काढावी असे राजकारण ठरले. रघुनाथपंताने पन्हाळ्यास येऊन शिवाजीची भेट घेतली. दोघांनी एकांतात बसून स्वारीचा विचार केला.

**कोप्पल म्हणजे दक्षिण दरवाजा काबीज (जानेवारी-मार्च १६७७) -**

कर्नाटकातील कोप्पल किल्ला म्हणजे कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या दरम्यान असणाऱ्या प्रदेशाची किल्ली होती. तो किल्ला ताब्यात असणे कर्नाटकातील आपल्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे पाहून महाराजांनी त्यावर हंबीरराव मोहीते व सेनापती जाधव यांची मोहीम पाठविली. उभयतांनी विजापूरी दरबाराचा अंमलदार हुसेन मियाना याला सळो की पळो करुन सोडले. हुसेन खानाने कोप्पलास जाऊन किल्ला मराठ्यांच्या ताब्यात दिला.[३०]

**शिवाजी महाराज आणि कुतुबशहा -**

जानेवारी १६७७ मध्ये शिवाजी भागानगरास गेला. बरोबर पंचवीस हजार निवडक घोडेस्वार होते. शिवाजी भागानगरास येताच मादण्णाने त्याचे स्वागत केले. महाराजांनी मोठ्या दिमाखाने कुतुबशहाच्या राजधानीत प्रवेश केला. त्यावेळी संपूर्ण शहर शृंगारले होते. नागरिकांनी महाराजांना पहाण्यास गर्दी केली तर सवाष्णींनी महाराजांना ओवाळले. महाराजांवर सोने/रुपे यांची फुले उधळली.[३१] पातशाही स्त्रीयांनी पडद्यातून शिवाजीला पाहिले. त्या थक्क झाल्या.[३२] उभयतांची भेट झाली. शिवाजीचा एकेक पराक्रम त्यांचेच तोंडून त्याने ऐकला.

दुसरे दिवशी कुतुबशहा व महाराज यांच्या भेटीत उभयपक्षी एक करार होऊन पुढील गोष्टी ठरल्या. शहाने रोज शिवाजीच्या फौजेसाठी तीन हजार होन देणे. २) पाच हजार फौज व तोफखाना शिवाजीच्या मदतीस पाठवावा. ३) महाराज जिंकतील तो प्रदेश शहास द्यावा व शहाजीने हस्तगत केलेला प्रदेश स्वत:कडे ठेवावा. ४) मोगलांविरुध्द लढण्यास परस्परांनी सहकार्य करावे. ५) शहाने शिवाजीचा एक वकील दरबारात ठेऊन घ्यावा. ६) शहाने एक लाख होन खंडणी दरसाल शिवाजीस द्यावी.

हा तह चालू असतानाच इतर पाहुणचार व सत्कार चालूच होते. बाजी सर्जेराव व येस्राजी कंक याचेबरोबर शहाच्या फौजा देऊन त्यांना शिवाजीने पुढे कर्नाटकात रवाना केले. आणि स्वत: शिवाजी सुमारे पाऊण महिना भागानगरात राहून पुढे निघाला.

**श्री शैल मल्लिकार्जुनाचे दर्शन –**

भागानगरास महाराजांचा मुक्काम तीन आठवडे ते महिनाभर होता. मार्च महिन्याच्या शेवटी महाराज कुतुबशहाचा निरोप घेऊन निघाले ते कनुल या शहरावर चालून गेले व पाच लाख होनांची खंडणी वसूल केली. त्यानंतर दक्षिणेतील प्रसिध्द तीर्थस्थानाकडे म्हणजेच मल्लिकार्जुनकडे वळले. या निसर्गरम्य स्थानात प्रवेश करताचा त्यांना सर्वस्वाचा त्याग करावा वाटला. तथापी जवळच्या लोकांनी त्यांना त्यापासून परावृत्त केले.

**जिंजीचा किल्ला काबीज –**

श्री शैलचे दर्शन घेऊन महाराज ससैन्य तिरुपतीवर आले. मद्रासच्या आसमंतात मेच्या प्रारंभी दाखल झाले. तेथून ९-५-१६७७ रोजी ५०,००० स्वार कांचीवरुन त्याने जिंजीवर रवाना केले. जिंजीचा विजापूर किल्लेदार नसीर महंमदखान यास शिवाजीचा अधिकारी (म्हणजे कोण?) किल्ल्यात जाऊन भेटला व त्याला वश करुन घेऊन किल्ला ताब्यात घेतला. शिवाजीने त्वरीत तेथे येऊन रायाजी नलगे यास किल्लेदार नेमले व विठ्ठल महादेव अत्रे गराडकर यास किल्ल्याखालील सुभेदारी सांगितली. अशाप्रकारे जिंजी प्रांतात मराठ्यांचा कारभार सुरु झाला.

**वेलोरचा किल्ला –**

जिंजिहून शिवाजी महाराज २३ मे रोजी ससैन्य वेलोर येथे गेले. त्या किल्ल्यावर अब्दुल्लाखान हा विजापुरी अधिकारी होता. त्याने किल्ला वाचविण्याचा प्रयत्न केला. तथापी शिवाजी महाराजांच्या सैन्याने २२-७-१६७८ रोजी म्हणजे तब्बल १४ महिन्यांनी वेलोरचा किल्ला शिवाजीस हस्तगत झाला.

**शेरखान लोदीचा पराभव –**

जिंजी प्रांताच्या दक्षिण विभागावर शेरखानची सत्ता होती. पाँडेचेरीचे फ्रेंच त्याचे सहाय्यक होते. त्यांच्या संमतीनेच फ्रेंचांनी पाँडेचेरीत आपली वखार काढली होती. त्यांच्यामुळेच आपण शिवाजीचा पराभव करु शकू असे शेरखानास वाटत होते. तथापी २६-६-१६७७ रोजी शिवाजी महाराजांचे सैन्य व शेरखानचे सैन्य यांची दृष्टादृष्ट झाल्यावर मराठ्यांपुढे आपला टिकाव लागू शकणार नाही हे ओळखून तो मागे हटू लागला. शिवाजीने त्याचा पाठलाग करुन त्याचा फन्ना उडविला. परिणामी तो शरण आला. २० हजार होन दंड व आपला मुलगा ओलीस ठेवून त्याने

आपली सुटका करुन घेतली. शिवाजीने कर्नाटकच्या सुभेदारीवर आपला जावई हरजी महाडिक यास नेमले. त्याने हा कारभार कैक वर्षे केला.[३३]

**<u>मदुरेच्या नायकाकडून खंडणी –</u>**

शेरखानचा पराभव केल्यावर महाराजांनी आणखी दक्षिणेकडे कूच केले आणि कोलेरुन नदीच्या उत्तर तीरावरील तिरुमलवाडी या ठिकाणी त्यांनी फौजेची छावणी केली. फ्रेंच वकीलाने तेथे त्यांना नजराणा अर्पण केला. मदुरेच्या नायकाचे राज्य कावेरीच्या दक्षिणेला होते. परंतु तोही महाराजांच्या स्वारीने घाबरुन गेला. कोलेरुन व कावेरी या नद्यांना पूर आल्याने महाराजांना त्याच्यावर स्वारी करणे अवघड होते. महाराजांनी त्याच्याकडून एक कोट रुपयाची खंडणी मागितली असतात त्याने २५ लाख रुपये कबूल केले. महाराजांनी फारसे ओढून न धरता त्या व्यवहारास मान्यता दिली.

**<u>शिवाजीराजे आणि बंधू व्यंकोजी –</u>**

मद्रास किनाऱ्यावर मोहीम चालू असतानाच महाराजांचा व्यंकोजी राजांशी पत्रव्यवहार चालू होता. व्यंकोजी राजांनी भेटीस यावे व शहाजीराजांच्या जहागीरीतील अर्धा वाटा द्यावा, असे महाराजांचे म्हणणे होते. तथापी व्यंकोजीची यास संमती नव्हती. हा प्रश्न सामोपचाराने सुटण्यासारखा दिसेना. तेव्हा महाराजांनी त्याच्या हालचालींवर नजर ठेवली. परिणामी शिवाजीराजे आपणास कैदेत टाकतील अशी भिती वाटून स्नानास जाण्याचे निमित्त करुन व्यंकोजीने पलायन केले (२३-७-१६७७). महाराजांना हे समजताच त्या घटनेचे दु:ख झाले. महाराज उद्‌गारले, ''अति धाकटे ते धाकटे, बुध्दीही धाकटेपणा योग्य किली.''[३४]

दरम्यान दक्षिणेत व विजापुरांकडे भानगडी उपस्थित झाल्याची बातमी आल्यामुळे पुढे कर्नाटकात जास्त राहण्याची सोय नव्हती. शिवाय कावेरीच्या उत्तरेस जितका व्यंकोजीचा प्रदेश होता. तितका महाराजांनी हस्तगत केला होता.

अशा परिस्थितीतही व्यंकोजीने शिवाजी महाराजांच्या सैन्याशी लढण्याचा प्रयत्न केला व त्यामुळे शिवाजीचे सैन्य आणि व्यंकोजीचे सैन्य यांचे युध्द १६-११-१६७७ ला सुरु झाले. सुरुवातीला शिवाजीच्या सैन्याचा पराभव झाला. तथापी रात्री व्यंकोजीचे सैन्य विश्रांती घेत असता शिवाजीच्या सैन्याने अचानक त्यांच्यावर स्वारी करुन व्यंकोजीस पराभूत केले. ही बातमी महाराजांना समजली तेव्हा त्यांनी रघुनाथ पंडित व हंबीरराव मोहिते यांचेकडे निरोप पाठविला, ''व्यंकोजीराजे आपले धाकटे बंधू आहेत. मूलबुध्दी केली. त्यास तोही आपला भाऊ. त्यास रक्षणे. त्याचे राज्य बुडवू नका.'' महाराजांचा असा हुकूम येताच मराठा अधिकाऱ्यांनी व्यंकोजीशी तह केला. त्यानुसार व्यंकोजी राजांकडे कोलेरुन नदीच्या दक्षिणेचे राज्य, तसेच त्या नदीच्या उत्तरेकडील काही किल्ले असावेत असे ठरले.

तर व्यंकोजी राजांनी महाराजांना ६ लाख रुपये खंडणी द्यावी. महाराजांकडे जिंजी प्रांत व म्हैसूर प्रांतातील शहाजी राजांच्या जहांगिरीतील महाराजांनी जिंकून घेतलेले प्रदेश असावेत असे ठरले.

कर्नाटक स्वारीची फलश्रुती काय? याची चर्चा अनेकांनी अनेक प्रकारे केली आहे. तथापी मराठी साम्राज्य वर्धनाच्या दृष्टीने विचार करता असे म्हणता येईल की, शिवाजीने पठाणेतर मुसलमान व इतर दक्षिणी यांची एकी राखूनच राजकारण राखले होते. त्यामुळे त्याला ही मोहीम अत्यंत यशस्वी करता आली व ती 'हिंदवी स्वराज्याचा' इमला विस्तृत व कायम करण्यास कारण झाली हेच खरे.[३५] असे बेंद्रे यांनी मत नमूद केलेले आढळते.

५-iii) **छ.संभाजी आणि कर्नाटक –**

छ.शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर अंतर्गत परिस्थितीशी आणि परकीय सत्ताधीशांशी सामना देत असतानाच संभाजी राजांनी महाराष्ट्रापासून लांब असलेल्या कर्नाटकातील प्रदेशाकडे दुर्लक्ष केले नाही. लांबच्या प्रदेशाची कामगिरी संभाजीने आपला मेव्हणा हरजी राजे महाडीक यावर सोपविली. त्याचेबरोबर शामजी पुंडे यासही कारभार सांगितला.[३६] त्याचबरोबर जैतजी काटकर व दादाजी काकडे हेही होते. कर्नाटकात म्हैसूर, मदुरा, तंजावर, रामनाड, इक्केरी इत्यादी छोटी छोटी पाळेगारांची राज्ये होती. परंतू त्यांच्यात आपापसात दुही होती. त्याचा पूर्ण फायदा घेण्याचे हरजीने ठरविले. त्याप्रमाणे त्याने कृती केली. त्याने म्हैसूरकरांना त्रिचनापल्लीहून आणि मदुरेच्या हद्दीतून हाकलून दिले. मदुरेच्या नायकाकडून म्हैसूरकरांनी घेतलेले सर्व गडकोट मराठ्यांनी जिंकून घेतले. या प्रगतीमुळे हरजी राजे दूरच्या प्रदेशात कारभार करण्यास किती योग्य आहेत हे संभाजी राजांच्या ध्यानात आल्यावाचून राहिले नाही. हरजीला कर्नाटकात पाठविण्याचा निर्णय योग्य ठरला होता. हरजीच्या तेथील युध्द कौशल्याबद्दल डॉ.मुद्दाचारी यांनी त्याचे कौतुक केले आहे. तथापी तो संभाजी राजांशी एकनिष्ठ नसल्याचे मत व्यक्त केले आहे.[३७] डॉ.कमल गोखले यांना तो गैरसमज वाटतो.[३८] सरदेसाईनीही संभाजीला हरजीबद्दल संशय आला असल्याचे म्हटले आहे.[३९] असे जरी असले तरी त्यामुळे संभाजीच्या कर्नाटकातील उद्योगाचे मोल कमी होत नाही.

कर्नाटकात संभाजीचा म्हैसूरकरांशी तीव्र झगडा झाला. म्हैसूरचा राजा चिक्कदेवराय आणि संभाजी यांच्यात जून १६८२ मध्ये मोठे युध्द झाले. त्यात संभाजीचा पराभव झाला.[४०]

संभाजीराजांनी या पराभवाचा बदला घेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे धोरण आखण्यास सुरुवात केली. त्यांना एकोजी व हरजीची मदत होती. त्यामुळे संभाजीने म्हैसूरकरांना मदुरेच्या राज्यातून हकलून देण्याचा सपाटा लावला. त्याचवेळेस संभाजीराजांनी त्रिचनापल्लीला निकराने वेढा घातला होता. संभाजी, एकोजी आणि हरजी यांच्या उद्योगामुळे व त्याला कोणी मित्र नसल्याने चिक्क देवरायला औरंगजेबाची मदत मागण्यावाचून गत्यंतर नव्हते.

तथापी मुघलांची मदत येईपर्यंत त्याला एकट्यालाच कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागले. संभाजी राजांनी म्हैसूरकरांची पाठ सोडली नाही. मराठ्यांपुढे टिकाव धरणे कठीण असल्यामुळे म्हैसूरकरांना माघार घ्यावी लागली.

बेदनूरच्या राणीनेही मराठ्यांना सहाय्य दिले होते.

चिक्कदेवरायाने संभाजी राजांशी तहाची बोलणी करुन खंडणी देण्याचे कबूल केले. तसेच गोवळकोंडेकर व विजापूरकर यांनीही संभाजी राजांना खंडणी देऊन व नजराणे पाठवून त्यांचा मोठेपणा वाढविला. दरम्यान म्हैसूरकरांनी मुघलांकडे मागितलेली मदत ऑगस्ट १६८४ मध्ये म्हैसूरला पोहोचली. मराठे उभयतांच्या सैन्याला तोंड देण्याच्या तयारीत होते. १६८४ च्या एप्रिल महिन्याच्या अखेरीस मराठ्यांनी धरमपुरीस वेढा घातला. डॉ.कमल गोखले म्हणतात ही माहिती जेसुदी पत्राच्या नेमकी उलट आहे.[४१]

काही असले तरी १६८२/८३ ही संभाजी राजांची पहिली कर्नाटक स्वारी मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराच्यादृष्टीने यशस्वीच ठरली असे म्हटले पाहिजे.

**<u>संभाजीराजांची कर्नाटकातील दुसरी स्वारी –</u>**

इ.स.१६८६ मध्ये म्हैसूर राज्यात संभाजी राजांनी दुसरी स्वारी काढली.[४२] या स्वारीत मोरस, तिगुड (तामीळ) कोडग, मलेय येथील नायकांनी संभाजी राजांना मदत केली.[४३] संभाजी राजांनी म्हैसूर राज्याचे केंद्रस्थान श्रीरंगपट्टणवर हल्ला केला. दरम्यान चिक्कदेवरायाला मारवाडांनी मदत दिल्याने मराठ्यांना जय मिळणे कठीण झाले.[४४]

श्रीरंगपट्टणचा वेढा चालू असतानाच मराठ्यांनी म्हैसूर राज्यातील प्रदेश लुटला. दरम्यान औरंगजेब पन्हाळ्याला वेढा देईल म्हणून संभाजीराजे घाईने कर्नाटक सोडून पुण्यास गेले.

इ.स.१६८६ नंतर हरजी महाडिकला कर्नाटकात मुघलांविरुध्द एकट्यालाच लढा द्यावा लागला. संभाजी राजांनी तो एकटा पडू नये म्हणून ऑक्टोबर / नोव्हेंबर १६८६ मध्ये केसोपंतास तिकडे जाण्याची आज्ञा केली. ते दोघे फेब्रुवारी १६८७ मध्ये १२००० सैन्यासह कर्नाटकात पोहोचले.[४५] मोगली सैन्याचा प्रतीकार केला. तथापी त्या दोघांच्यात यादवी युध्द सुरु झाल्याने पुढे-पुढे सरकरणाऱ्या मोगली सैन्यास ते मागे हटवू शकले नाहीत.

१६८९ मध्ये संभाजी राजे पकडल्याची बातमी कर्नाटकात पोहचताच हरजीने केसोपंतास कैद करुन टाकले. पण पुढे राजाराम महाराज जिंजीस पोहोचण्यापूर्वीच १९-८-१६८९ रोजी हरजीने केसोत्रिमल यास सोडूनही दिले. तो स्वतः २९-९-१६८९ रोजी मरण पावला. हरजी राजे आणि केसोत्रिमल यांच्यात सत्तेसाठी चढाओढ किंवा काही वितुष्ट असले तरी ते ते दोघेही संभाजी महाराजांशी एकनिष्ठ होते. मुघलांविरुध्द लढताना ते दोघे एक होत असत. हरजी राजे मुघलांना जाऊन मिळतील अशा अफवा पसरल्या होत्या. परंतु त्यात तथ्य नव्हते. शिवाजी महाराजांनी जिंकलेला मुलुख त्यांनी सांभाळला व त्यात थोडीफार वाढही केली असे दिसते.

डॉ.कमल गोखले संभाजीच्या कर्नाटक प्रकरणावर भाष्य करताना लिहितात की, संभाजी राजांनी कर्नाटकच्या बाबतीत शिवाजी महाराजांचेच धोरण पुढे चालू ठेवले. कर्नाटकातील मराठी सैनिकांनी मुघल आक्रमणाला तोंड देऊन मुलुख सांभाळल्यामुळेच राजारामाला संकटकाळी कर्नाटकात आश्रय घेता आला. हरजीसारखा दूरदर्शी आणि

धोरणी मुत्सद्दी कर्नाटकात असल्यामुळे काही हिंदू पालेगारांचा चांगला लाभ होऊन मराठ्यांच्या प्रांताचे संरक्षण झाले. हरजीसारखा शहाणा व धूर्त मुत्सद्दी तेव्हा कर्नाटकात होता म्हणूनच चंदी प्रांतातील मराठ्यांची सत्ता कायम राहिली आणि त्याचा पुढील काळात राजाराम महाराजांना फारच चांगला उपयोग झाला.[४६] वा.सी.बेंद्रे म्हणतात, संभाजीराजांनी हिंदवी स्वराज्याची व्याप्ती प्रदेश मर्यादित संकुचित न ठेवता अखील हिंदवी समाजापुरती विस्तृत ठेवली होती. हेच हिंदवी स्वराज्याच्या संघटनेच्या दृष्टीने मोठे कार्य होते. आणि संभाजीराजांनी आपला मन:क्षोभ होऊ न देता ते शांतपणे केले. पुढे यामुळे औरंगजेबास सतत १९-२० वर्षे झगडूनही दक्षिण हिंदुस्थान दुर्जेयच राहिला.[४७]

डॉ.के.एन.चिटणीस लिहितात, ''If Sambhaji had more time, he would certainly fulfilling his vision of a united and strong South to serve as a bull work against the Mughal."[४८]

संभाजीचा एकूणच पराक्रम व शौर्य पाहता चिटणीसांचे मत मान्य होण्यास हरकत नसावी.

### ५-iv) **राजाराम महाराज आणि कर्नाटक –**

कर्नाटकातील संभाजीकालीन सर्वाधिकारी हरजी राजे महाडिक ऑक्टोबर १६८९ मध्ये मरण पावले. आणि त्याच महिन्याच्या अखेरीस संभाजीच्यावधानंतर रायगडाहून निसटलेला राजाराम महाराज जिंजीला येऊन पोहोचले. राजारामाचा हा प्रवास सरळपणे होणे शक्यच नव्हते. रजाराम महाराजांच्या या प्रवासाचे अनेकांनी वर्णन केले आहे. दरम्यान मुघल फौजा कर्नाटकभर विखुरले असल्याने राजाराम महाराजांचा त्यांनी पाठलाग करुन त्यांना तुंगभद्रा नदीच्या एका बेटावर गाटले. सुभानगड हे त्या बेटाचे नाव होय. हे बखरीत आलेले आढळते. तथापी नकाशात त्याचा उल्लेख नाहीअसे ना.ह.कुलकर्णी म्हणतात.[४९]

राजाराम कर्नाटकात गेला त्यावेळेस त्याच्याबरोबर त्या प्रवासात सेनापती पानसंबल, प्रल्हाद निराजी निळकंठ मोरेश्वर व बहिरो मोरेश्वर पिंगळे, खंडो बल्लाळ, कृष्णाजी अनंत सभासद इ. महत्वाची माणसे होती.[५०] साधारण २५० जणांची फौज राजाराम महाराजांच्या रक्षणासाठी होती. संताजी घोरपडे जिंजिच्या प्रवासात राजारामाबरोबर नव्हता. तथापी मजल दरमजल करीत हा अत्यंत खडतर प्रवास करुन अखेर राजाराम महाराज नोव्हेंबर १६८९ मध्ये जिंजीला पोहोचले.[५१] ना.ह.कुलकर्णीच्या मते कर्नाटकातील संस्थानिकांच्या मदतीनेच राजाराम जिंजीला पोहचू शकला. राजाराम कर्नाटकात जाताच हिंदु सत्ताधीशांना धीर आला आणि ते आपल्या फौजा, धन व नजराणे घेऊन त्यास सामील झाले. राजारामाच्या नेतृत्वाखाली लोक आणि लष्कर संघटीत होत होते.[५२]

वरील सैन्याखेरीज कुतुबशाही सैन्यातून निसटून आलेले काही सैनिकही राजाराम महाराजांच्या आश्रयाला येऊन राहिले. महंमद सादिक इस्माईलखान आणि याचप्पा नाईक हे तीन कुतुबशाही सरदार महाराजांच्या झेंड्याखाली जमा झाले. तथापी इस्माइलखान मका हा पुढे झुल्फीरकारखान यांना मिळाला. पण याचप्पा नाईक राजारामाबरोबरच

राहिला. राजारामाची अशी प्रगती जिंजीकडे चालली असताना. औरंगजेब स्वस्थ बसणेच शक्य नव्हते. तो तसा स्वस्थ बसलाही नाही. त्याने राजाराम महाराजांवर झुल्फिकारखानाची नेमणूक केली. तो सप्टेंबर १६९० अखेरीस जिंजीनजिक पोहेचला.[५३]

जिंजीच्या परिसरात पोहचलेल्या मोगल सैन्याला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. चोहोबाजूंनी मराठे सैन्य मोगल सैन्याची लांडगेतोड करत होते. ही बातमी बादशहाला समजल्यावर त्याने वजीर असदखानाला मोठ्या सैन्यानिशी जुल्फीकार खानाच्या मदतीला पाठविले. त्याच्या पाठोपाठ कामबक्षालाही रवाना केले. मोगल सैन्याची एवढी मोठी संख्या जिंजीजवळ जमली, तरी पण काही दिवस मोर्चे बांधण्याची देखील मराठी सैन्याने सवड मिळू दिली नाही. अर्थात मराठ्यांच्या अशा सर्व हालचालींमागे संताजीचे गनिमी डावपेच आणि धाडसी हल्ले यांचे बळ होते. संताजीच्या या उद्योगामुळे झुल्फिकारखानाने कांचीचा फौजदार अलिमर्दानखान यास म्दतीसाठी बोलाविले. ही बातमी संताजीला समजताच संताजी त्याच्या पाठोपाठ आला. मोगल हरले. खान मराठ्यांच्या हाती सापडला. फार मोठी रक्कम देऊन १३-१२-१६९२ ला त्याने सुटका करुन घेतली.[५४]

त्यानंतर पुन्हा लढाई झाली. त्यात पुन्हा मोगलांचा पराभव झाला.[५५]

दरम्यान शहजादा कामबक्ष आणि सेनापती झुल्फीकारखान यांचे मतभेद वाढू लागले. अर्थात संताजीच्या दृष्टीने ही परिस्थिती अनुकूल होती, असे जे गर्गे म्हणतात ते योग्य होय.[५६]

यानंतर संताजीने कासीमखान आणि इस्माईलखान यांचा जोरदार प्रतिकार केला. झुल्फिकारखानाने कासीमखानाला७-२-१७९३ ला वाँदिवाशला नेले.[५७] तर इस्माईलखानाला मराठ्यांनी पकडून त्याच्याकडून मोठी रक्कम घेतली व त्याला सोडून दिले.[५८] मार्च १६९३ मध्ये संताजीने त्रिचनापल्लीला वेढा दिला. त्याच्या बरोबर राजाराम महाराजही होते. त्रिचनापल्लीच्या नायकाने महाराजांशी एक तहही केला. १० मे १६९३ नंतर तंजावरास जाऊन त्यांनी शहाजीची भेट घेतली. (मे १६९३)[५९]

यानंतर मोगल मराठा संघर्षातील महत्वाची घटना म्हणजे संताजीचा दुड्डेरीचा महान विजय होय (१६९५) या लढाईचे वर्णन श्री.स.मा.गर्गे यांनी अनेक साधनांच्याद्वारे केले आहे.[६०] त्यावरुन संताजीचा कर्नाटकातील पराक्रम व मोगलांची दाणादाण स्पष्ट होते. दुड्डेरीच्या लढाईतील संताजीच्या यशाविषयी श्री.ना.ह.कुलकर्णी लिहितात, ''दुड्डेरीच्या या लढाईत संताजीचे अप्रतिम रणचातुर्य दिसून आले. पण त्याचबरोबर चित्रदुर्गच्या संस्थानिकाने त्याला केलेल्या साहाय्याचा खूपच उपयोग झाला. अर्थात त्याने संताजीला साहाय्य केले त्याच्या पाठीमागे त्याचा हेतू मुघलांना संताजीने लुटल्यावर त्याच्यातील बराच वाटा मिळेल अशी भरमप्पाची अपेक्षा होती. म्हणजेच भरमप्पाची मदत निरपेक्ष भावनेने दिलेली नव्हती तर योग्य संधीचा उपयोग करुन घेण्याची ती दृष्टी होती. कोणतेही महान तत्व त्या मदतीमागे नव्हते हे उघड दिसते. पुढे हाच भरमप्पा इ.स.१७०० मध्ये मुघलांना मदत करताना व त्यांच्याकडून मानाची वस्त्रे मिळवतानाही दिसतो.''[६१]

दुड्डेरीच्या महान विजयानंतर संताजीने अवघ्या महिनाभरात आणखी एक महान विजय संपादन केला तो म्हणजे हिंमतखानावरील बसवापट्टणचा विजय (२०-१-१६९६) यानंतर संताजीचा अल्पावधीतच जून १६९७ मध्ये खून झाला आणि महाराष्ट्रात आणि कर्नाटकात मराठी राज्य संकटात सापडले असता त्याचा बचाव करण्यासाठी रांत्रंदिन तळहाती शिर घेऊन लढणाऱ्या एका लढवैय्यांला मराठी राज्य मुकले.

संताजीच्या मृत्यूनंतर वेळ मारुन नेण्यासाठी राजाराम महाराजांनी जुल्फीकारखानाशी तहाच्या वाटाघाटी चालविल्या ही बातमी बादशहाच्या कानावर गेली. तेव्हा कोणत्याही परिस्थितीत किल्ला घ्या नाही तर गंभीर परिणाम होतील, अशी तक्रार बादशहाने खानास दिली. तेव्हा खानाने राजाराम महाराज जिंजीतून बाहेर गेले. (डिसेंबर १६९७ च्या आरंभी)

त्यानंतर खानाने जिंजीच्या किल्ल्यावर हल्ला करुन तो किल्ला ताब्यात घेतला. ७-२-१६९८ राजाराम महाराज सुखरुपपणे २२-२-१६९८ मध्ये विशाळगडास दाखल झाले. झुल्फिखारखानाने किल्ला जिंकून घेणे, महाराज बाहेर पडून महाराष्ट्रात सुखरुप परतणे, या घटनेवर भाष्य करताना प्रा.जयसिंगराव पवार म्हणतात, ''राजाराम महाराज आपल्या राण्यांसह जिंजीबाहेर निसटल्यानंतर झुल्फिकारखानाने जोराचा हल्ला करुन किल्ला जिंकून घेतला. तथापि, राजाराम महाराजांना कैद करण्याचा जिंजिच्या वेढ्यातील मोगलांचा उद्देश मात्र सफल झाला नाही. आठ वर्षांचा वेढा व श्रम फुकट गेले.[६२]

५-v) **ताराबाई आणि कर्नाटक –**

फेब्रुवारी १७०२ सालापासून ताराबाईनी आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसून येते. त्यांच्या कारकिर्दीत पहिल्या दोन वर्षात (१७००-१७०२) मराठे महाराष्ट्राबाहेर फारसे धामधूम करताना दिसत नाहीत. परंतु सन १७०२ सालापासून महाराष्ट्राच्या बाहेर गुजराथ,माळवा, आंध्र, कर्नाटक व तामीळनाडू इत्यादी भागात मराठे धाडसी आक्रमणे करीत असल्याचे दिसून येते. मोगल बादशहा स्वराज्यातील किल्ले घेण्याच्या उद्योगात असता त्याच्या साम्राज्याच्या इतर सुभ्यावर स्वाऱ्या योजून त्या यशस्वी करण्याचे ताराबाईचे धोरण अतीशय मुत्सद्देगीरीचे होते. मराठ्यांच्या या लष्करी धोरणामुळे बादशहाने जिंकलेल्या दक्षिणेच्या सुभ्यात अराजक तर माजलेच शिवाय माळव्यासारख्या संपन्न सुभ्यावर मराठ्यांनी आक्रमणे केल्यामुळे मोगली साम्राज्यास जबर धक्का बसला. दक्षिण तर हातातून निसटत आहेच, परंतु मूळच्याच साम्राज्याचे कसे संरक्षण करावे, हा प्रश्न बादशहास सतावू लागला.

१७०२ मध्येच ताराबाईनी कृष्णा सावंतास माळव्यात पाठविले. मराठ्यांनी बऱ्हाणपुरवर हल्ला चढविला. शहर उध्वस्त केले. तेथील सुभेदाराला कैद केले आणि खंडणी देऊन सोडूनही दिले.

त्यानंतर मराठे गोवळकोड्याच्या बाजून सरकले. तेथेही त्यांनी तेथील सुभेदाराला शहर बेचीराख करण्याची धमकी दिली. तो मराठ्यांना शरण आला. त्याने मराठ्यांना भली मोठी खंडणी देऊन स्वत:ची सुटका करुन घेतली.

मराठ्यांनी गोवळकोंड्यात असा विजय मिळविला. तथापी वेलोर मात्र १४-८-१७०२ रोजी दाऊदखान पन्नी याने हस्तगत केले. ही वार्ता बादशहास समजताच त्याने तंजावरचा राजा, त्रिचनापल्लीची राणी आणि कर्नाटकातील इतर पालेगार यांच्याकडून मराठे वसूल करीत असलेली खंडणी आपण वसूल करावी अशी आज्ञा दाऊदखानकडे पाठविली.

जून १७०४ मध्ये मराठे हैद्राबादच्या प्रदेशात घुसले. गोवळकोंडा शहरावर हल्ला करुन त्यांनी ते लुटले. गोवळकोंड्याचा सुभेदार हतबल होऊन भागानगरच्या किल्ल्यात जाऊन लपला होता. परंतु मराठ्यांनी त्याची पाठ सोडली नाही. त्याला अनेक प्रकारच्या धमक्या देऊन त्यांनी त्याच्याकडून मोठी रक्कम उपटली आणि मगच ते पसार झाले.[६३]

मे १७०४ मध्ये धनाजी जाधव, हणमंतराव निंबाळकर, हिंदुराव घोरपडे हे पन्नास साठ हजार घोडदळासह कर्नाटकी प्रदेशात शिरले.[६४] त्यांच्यापुढे अनेकांनी शरणागती पत्करली. यावेळी कर्नाटकात मोगलांचा दाऊदखान पन्नी हा मातबर सरदार फौजेसह होता. त्याची मराठी फौजेपुढे गाळण उडाली. त्याने आपला वकील पाठवून मराठ्यांना विनंती केली की, त्यांनी आपणास त्रास देऊ नये. त्याच्या मोबदल्यात आपण दोन लक्ष रुपये खंडणी देऊ. मराठ्यांनी खानाच्या वकीलाकडे लक्ष दिले नाही. त्यानी वकीलाकरवी खानाकडे निरोप पाठविला की, खानाने मराठ्यांना पैसे देण्याविषयी यातायात करु नये, पैसे वसूल कसे करावयाचे, हे मराठे चांगले जाणतात. मराठ्यांकडून अशा प्रकारचे प्रत्युत्तर आल्यावर खानाने अर्काट सोडून वेलोरच्या किल्ल्यात स्वत:ला कोंडून घेतले.

दरम्यान मराठ्यांची एक फौज गोवळकोंड्याकडे गेली. तर एक फौज कर्नाटकातील ठाणी व प्रदेश काबीज करण्याच्या उद्योगास लागली. मराठ्यांच्या असा धुमाकूळ चालू असताना दाऊदखानाने त्यांच्याशी तह करण्याचा प्रयत्न केला. मराठ्यांनी कर्नाटकात निघून जावे म्हणून त्याने त्यांना पाच लाख रुपये दिले. मराठ्यांनी पैसे घेतले पण ते अदोनी व सिरा यांच्या आसपास लुटी करतच राहिले.

ऑगस्ट १७०४ मध्ये खान अदोनीकडे जात असता खानाला मराठ्यांनी घेरले. तथापी खानाने धर्मावरन किल्ल्याचा आश्रय घेतला. खानाचा अशा वेळेस बिमोड होणार नाही, हे ताडून मराठ्यांनी सात लाख रुपये दंड घेऊन दुसरीकडे कूच केले.[६५]

## बादशहाची वाकिणखेड्याची मोहिम (१७०४-१७०५) -

कृष्णा व भीमा यांच्या दुआबात बेरड लोकांनी मराठ्यांप्रमाणेच बंड उभारले होते. ते मोडण्यासाठी बादशहाने आपले अनेक नामांकित सेनानी वारंवार पाठविले होते. ते बंड मात्र मोडले नाही. म्हणून बादशहाच ऑक्टोबर १७०४ बेरडांची राजधानी वाकिणखेडा घेण्यासाठी मोहीमेवर निघाला.[६६] बादशहाशी चाललेल्या युध्दात बेरड आणि मराठे यांची युती जमली होती. तथापी बादशहालाच या युध्दात विजय मिळाला. (२७-४-१७०५) अर्थात विजय मिळूनही त्याला उत्तर कर्नाटकातील मराठे आणि बेरडांचा धुमाकूळ मात्र थांबविता आला नाही.[६७]

वाकिणखेडा जिंकल्यापासून बेरड आणि मराठे विशेषत: घोरपडे कर्नाटकात सतत धुमाकूळ घालत होते. मराठी फौजा ओरीसा व गुजरात या प्रदेशात मोहिमा करत होत्या त्या वेळी मराठ्यांची एक फौज हिंदुराव घोरपड्याच्या नेतृत्वाखाली कर्नाटकाता धामधूम माजवित होती. हिंदुरावाच्या साहाय्यास पिरनायक बेरडाची फौज होतीच. या संयुक्त फौजेने पेनुकोंडा किल्ला घेऊन किल्लेदारास कैद केले.[६८] पेनुकोंडा किल्ला म्हणजे विजापुरी कर्नाटक व गोवळकोंडा कर्नाटक या विस्तीर्ण प्रदेशांच्या संरक्षण व्यवस्थेची किल्लीच होती.

हे सर्व राजकारण चालू असतानाच २०-२-१७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूने हिंदुस्थानाच्या इतिहासातील एक पर्व संपले. १६८१ मध्ये सुरु झालेले मराठ्यांचे युध्दही संपले. सतत २५/२६ वर्ष तो मराठ्यांशी झगडला पण त्या तो अपेशी ठरला. शेवटी मराठ्यांचे राज्य त्याला जिंकता आले नाही. दक्षिणेतच त्याला चिरशांती घ्यावी लागली. बादशहाच्या मृत्यूनंतर अवघ्या दोन तीन महिन्यात मोगली किल्लेदारांकडून ताराबाईनी सिंहगड, पुरंदर, पन्हाळा, पावनगड, विशाळगड, सातारा, परळी हे अत्यंत महत्वाचे किल्ले जिंकून घेतले. बादशहाच्या पराभवावर भाष्य करताना प्रा.जयसिंगराव पवार म्हणतात,''बादशहाची कित्येक वर्षांची मेहनत व कित्येक मोगली सैनिकांचे बलिदान असे पूर्ण वाया गेले.''[६९]

## ५-vi) छत्रपती शाहू –

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर अल्पावधीतच छत्रपती शाहूचे महाराष्ट्रात आगमन झाले. ताराबाईशी झालेल्या युध्दात तो विजयीही झाला. १२-१-१७०८ रोजी त्यांनी स्वत:ला राज्याभिषेकही करविला. पुढे बाळाजी विश्वनाथास त्यांनी पेशवेपद दिले. आणि मराठा साम्राज्य वृध्दीला अधीक गतीआली. (१७-११-१७१३) कोकण आणि कर्नाटक आपल्या ताब्यात आणावे असा त्यांनी विचार केला व कर्नाटकातील अनेक पालेगारांना त्यांनी आपली सत्ता मानण्याचे आवाहनही केले. तसेच हरजीराजे महाडीक याचा मुलगा शंकराजी यास कर्नाटकचे बंदोबस्तास रवाना केले.

सन १७१९ च्या बादशाही सनदांनी मोगल प्रदेशावर चौथाईचे हक्क मराठ्यांस प्राप्त झाले. त्यांची अंमलबजावणी करीत असता कर्नाटक प्रांत आपल्या ताब्यात यावा ही शाहू महाराजांची मनीषा होती. म्हणून कर्नाटकाच्या हद्दीवरील अक्कलकोटचा प्रदेश त्यांनी आपले मानसपुत्र फत्तेसिंग भोसले यांना जहागिर म्हणून दिला. हेतू हा की, कर्नाटक प्रदेशावर फत्तेसिंगाची नजर राहिल. कर्नाटकात जोपर्यत मुसलमान सत्ता रुढ झालेली नाही तोपर्यंतच तो प्रदेश आपल्या सत्तेखाली येईल असे शाहू महाराजांना वाटत होते. शिवाय कर्नाटकाचे धनी निजामाऐवजी मराठे आहेत असेही शाहू महाराजांना दाखवावयाचे होते म्हणून त्यांनी दोनदा मराठे सरदार कर्नाटकात रवाना केले.[७०]

### पेशवा बाजीराव आणि कर्नाटक –

बाजीरावाने इ.स.१७२५-२६ सालात एक आणि १७२६-२७ सालात एक अशा दोन स्वाऱ्या कर्नाटकात केल्या पहिल्या स्वारीलाचित्रदुर्गची स्वारी तर दुसरीला श्रीरंगपट्टणची स्वारी असे म्हणतात.

१७२५-२६ या वर्षीच्या कर्नाटकच्या बाजीरावाच्या स्वारीची योजना केव्हा मक्रूर झाली हे समजत नाही असे खरे म्हणतात.[७१] या स्वारीची योजना आखताना प्रथम बाजीरावास या स्वारीत धाडण्याचा शाहूचा मानस कदाचित नसावा पण पुढे बाजीरावासही या स्वारीवर धाडण्यात आले. तेव्हा या स्वारीचे अधिपत्य बाजीरावाकडे नसून प्रतिनिधी कडेच होते असे म्हटले पाहिजे.

प्रस्तुत कर्नाटकचे स्वारीत जाण्याची शाहूने खंडेरावास आज्ञा केली. तथापी त्याने आपला पुत्र त्र्यंबकराव यास चार हजार फौजे निशी प्रतिनीधीच्या मदतीस पाठविले.[७२] बाजीराव पेशव्यांनी पहिली स्वारी २०-११-१७२५ ला पुण्याहून सुरु केली. १२-३-१७२६ ला मराठे चित्रदुर्गला पोहोचले. दरम्यान बाजीराव पेशव्यास वाटेत बेदहरी येथे ता.१४-२-१७२६ रोजी अब्दुल गफार पठाण येऊन भेटला. हा कोण, कुठला कोणत्या हेतूने बाजीरावास भेटला व भेटीतून काय निष्पन्न झाले याविषयी काहीच माहिती मिळत नाही. पण हा सावनूरच्या नबाबाचा पूर्वज असून मराठ्यांशी मैत्री करावी व तिच्या जोरावर कर्नाटकात स्वत:ची सत्ता वाढवावी या उद्देशाने आला असावा.[७३] याच सुमारास सोंधेकरांकडून मदतीची मागणी झाल्याने शाहूने माफक खंडणी घेऊन सोंधे संस्थानचे रक्षण करण्याचे ठरविले. आणि त्याविषयी बोलाचाली करण्यासाठी गोपाळ राम नावाच्या मनुष्यास ता. २१-०२-१७२६ रोजी प्रतिनीधी व प्रधान यांजकडे धाडले.[७४]

दरम्यान मराठ्यांच्या फौजा बाहेर पडून दोन महिने होऊन गेले तरी शाहूला काही खबर कळली नाही म्हणून तो अस्वस्थ झाला. प्रतिनिधी, बाजीराव व सरलष्कर , त्रिंबकराव दाभाडे या सर्वांस त्याने ता. २१-०३-१७२६ रोजी एक खरमरीत पत्र लिहिले. त्यात शाहू म्हणतो,''तुम्ही सर्व कुलअखत्यारी सेवक कोठपर्यंत गेला, काय मनसुबा करीता हे गेल्यादारभ्य कळविले नाही यावरुन अपूर्व भासते तरी प्रतिदिनी स्वामीस कळवित जावे''.[७५] या स्वारीत मराठी फौजांनी जाऊन तुबलेल्या खंडण्या वसूल केल्या. चित्रदुर्गाहून येताना बाजीराव पेशवे दुरगुंड, गोकाक, बहे बोरगाव, कालागाव मार्गे सातारास २३-५-१७२६ रोजी पोहोचले.

**<u>श्रीरंगपट्टणची स्वारी –</u>**

बाजीराव पहिल्या स्वारीतून परत येताच निजामाने किंवा त्याच्या हुकूमात वागणाऱ्या हस्तकांनी हिंदु सत्ताधीशांवर (कर्नाटकातील) चढाई केली. सरदेसाई लिहितात,''यावरुन शाहून केलेला उद्योग निजामाने मोडून काढण्याचा प्रयत्न केला हे स्पष्ट होते''. [७६]

इ.स. १७२६ च्या पावसाळ्याच्या आरंभी लक्ष्मेश्वर परगण्याचा देशमुख खानगौडा आणि सुरेराव यांनी सावनूरच्या नबाबाविरुध्द शाहूकडे तक्रार करुन मदतीची याचना केली. शाहूने त्यास मदतीचे आश्वासन देऊन दसऱ्यास आपण फौजा रवाना करु असे सांगितले. त्यानुसार त्याने बाजीराव खंडेराव दाभाडे आणि सुलतानजी निंबाळकर यांना फौजा जमविण्याचा हुकूम केला व तथापी या हुकूमानंतर दोन महिने गेले तरी फौजा जमल्या नाहीत.

तेव्हा बाजीराव आणि दाभाडे यांस शाहूने स्वहस्ताक्षरी आज्ञा लिहून कळविले की, विजयादशमीच्या मुहूर्ते उभयंता स्वार होऊन दिवसगत न लावता अतिसत्वर फौजेची तयारी करुन पंढरपूरच्या रोखे येणे.

या स्वहस्ताक्षरी आज्ञेचा परिणाम होऊन बाजीराव आणि दाभाडे दोघेही स्वारीवर निघाले. सरलष्कर मात्र स्वारीवर आल्याचे दिसत नाहीत. कारण यापुढे दोन महिन्यांनी म्हणजे तारीख १८-११-१७२६ रोजी शाहूने सरलष्करास पाठविलेल्या पत्रात प्रधान व सेनापती असे दोघेच दक्षिण प्रांती मसलतीस गेल्याचा उल्लेख आहे.

या स्वारीची सुरवात २१-१०-१७२६ ला झाल्याचा उल्लेख खरे करतात.[७७] तर खोब्रेकर २३-१०-१७२६ ला या स्वारीची सुरुवात झाली असे म्हणतात.[७८]

२१ किंवा २३-१०-१७२६ ला निघालेले मराठे १३-१२-१९२७ ला श्रीरंगपट्टणास पोहोचले. व तेथे त्यांनी महिना काढला. याच सुमारास साताऱ्याकडे काही मनसुब्याचा प्रसंग आल्यामुळे शाहूने सेनापती व प्रधान यांस परत बोलाविले. त्यामुळे म्हणा किंवा परत फिरण्याचा समय आला म्हणून म्हणा तारीख ८-३-१७२७ ला सैन्ये परत निघाली ती २७-४-१७२७ ला साताऱ्यात परत आली.[७९]

निजामाच्या स्वारीमुळे सन १७२७ च्या कर्नाटकाच्या स्वारीत बाजीरावाचे चित्त अत्यंत अस्वस्थ राहिले. त्यामुळे पाहिजे होती तितकी कार्यसिध्दी स्वारीत होऊ शकली नाही. तथापी या दोन स्वाऱ्यांची कामगिरी पुष्कळच यशस्वी झाली आणि कर्नाटकात वावरणाऱ्या एकाकी घोरपड्यांना पाठिंबा मिळून मराठेशाहीच्या त्या भागातील फैलावास सुरवात झाली हे स्पष्ट आहे असे सरदेसाई लिहीतात.[८०]

खरे लिहीतात, या स्वाऱ्यांचा हेतू व फलित याविषयी नीट माहिती मिळत नाही. स्थळे, किल्ले सोडवावे, पालेगार, मंडलीक राजे यांच्यापासून ठरावाप्रमाणे खंडण्या घ्याव्यात हा हेतू असल्यास तो कितपत साध्य झाला हे समजणे कठीण आहे. तथापी एवढे निश्चित की या दोनही स्वाऱ्यात पालेगार, मांडलीक राजे व इतर यांकडून खंडणी वगैरेच्या रुपाने द्रव्यप्राप्ती मुळीच झाली नाही. ठाणी बसविण्याचा उद्योग कितपत यशस्वी झाला हे समजण्याचेही साधन नाही. पण लक्ष्मीमेश्वर देसाई, सौंधेकर इ.कडून मदतीची याचना केली गेली. त्याअर्थी मराठ्यांच्या सामर्थ्याविषयी कर्नाटकातील लोकांच्या अनुकूल व चांगल्या कल्पना असाव्यात आणि दोन स्वाऱ्यात द्रव्य प्राप्ती झाली नसली तरी मराठ्यांचा नक्श त्याबाजूस रहाणेचे कामी या स्वाऱ्यांचा चांगला उपयोग झाला असावा.[८१]

सन १७४० मध्ये बाजीराव पेशव्याचा मृत्यू झाल्यावर त्याचा मुलगा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे पदावर आला. त्याच्या काळात मराठ्यांनी कर्नाटकात १७६० पर्यंत अनेकवार स्वाऱ्या केल्या. मराठ्यांना विजयही मिळाले. तथापी पेशव्याने कर्नाटकात कोणासही शिरकाव न दिल्याने हैदरअली पुढे कर्नाटकात प्रबळ होऊ शकला.

खोब्रेकर म्हणतात, पेशव्याने कर्नाटक मामला स्वत:कडेच न घेता मुरारराव घोरपडे यावर सोपवून त्यासच त्याबाबतीत मुख्याधिकार दिले पाहिजे होते. म्हणजे मराठ्यांची उत्तरेत झालेल्या दाणादाणीचा परिणाम कर्नाटकातून मराठ्यांची सत्ता विस्कळीत होण्यात झाला नसता. बुंदेले, शिंदे, होळकर यांच्यासारखेच कर्नाटक प्रांत मुरारराव

घोरपडे किंवा गोपाळराव पटवर्धन यांपैकी कोणा सरदाराकडे सोपविला असता तर कर्नाटकातील मराठ्यांच्या सत्तेस धक्का लागला नसता. पेशव्याने कर्नाटकात मुलूखगिरी करुन मराठी सत्ता १७५९ पर्यंत कर्नाटकात फैलाविली. ती एवढी जबरदस्त होती की त्या सत्तेला विरोध करणे अशक्य हे पोर्तुगीजांनीही मान्य केले. तथापी, मुलुखगिरी करुन पैसा मिळविताना पेशव्याने जिंकलेल्या प्रांताचा अंमल व्यवस्थित चालविण्यासाठी आपली राज्यकारभार यंत्रणा पक्की केली नाही.[८२]

## संदर्भ टिपा


१) भारतीय संस्कृती कोष, खंड २, पृ. १२६

२) याविषयी मतभेद आहेत. बेंद्रेंच्या मते शहाजीचा जन्म १६०१ चा आहे.

३) जयसिंगराव पवार, मराठे सत्तेचा उदय, मुंबई १९७९, पृ.४५-४६

४) म.री., खंड १, पृ. ९२-९३

५) वा.सि.बेंद्रे, मालोजी राजे आणि शहाजी महाराज, मुंबई १९७६, पृ. ४२४

६) म.री., खंड १, पृ. ९७

७) ग.ह.खरे, ऐ.फा.सा., खंड ४, ले. १

८) बेंद्रे, उपरोक्त, पृ.४५३

९) कित्ता, पृ. ४६०

बेंद्रे ज्या दडपणांचा उल्लेख करतात ती कोणती याचा मात्र निर्देश करताना आढळत नाहीत.

१०) पवार, उपरोक्त, पृ. ४८

११) म.री., खंड १, पृ. ११३

१२) बेंद्रे, उपरोक्त, पृ. ५२७

१३) म.री., खंड १, पृ. १२३ नवे संदर्भ, संदर्भ क्र.५

१४) कित्ता, पृ. ११७

१५) डॉ.बाळकृष्ण नुसत्या ७५ कवींचा उल्लेख करतात.

Dr.Balkrishna "Shivaji the Great" Bombay 1932, p.57

तर बेंद्रे सर्व कवींची नांवे देतात. उपरोक्त, पृ. ५३५

१६) म.री., खंड १, पृ. ११७

१७) राजवाडे, राधा माधव चंपू, पुणे १९९१, पृ. १०१ (दु.आ.)

१८) म.री., खंड १, पृ. ११९

१९) कित्ता, पृ. ३१३

२०) J.Sarkar "Shivaji and his times", Calcutta 1919, p. 365

२१) त्र्यं.शं.शेजवलकर, श्री छत्रपती, मुंबई १९६४, पृ. १६७

२२) सेतुमाधवराव पगडी, शिवचरित्र एक अभ्यास, पृ. २२६

२३) Dr.B.Muddachari, "Mysore Martha relations", Mysore 1969, p. 98

२४) केळकर आणि आपटे, शिवकालीन पत्र सारसंग्रह, पुणे १९३०, प. २३-३२

२५) वा.सी.बेंद्रे, छ.शिवाजी महाराज यांचे चरित्र, मुंबई १९७२, पृ. २०७

२६) जयसिंगराव पवार, उपरोक्त, पृ. २०७

२७) भिमराव कुलकर्णी (सं), स.ब., पुणे १९७७, पृ. ८६-८७

२८) ऐ.हा.सि., खंड ३, ले. १८

२९) ग.ह.खरे, निवडक लेख, पृ. ६७

३०) म.री., खंड १, पृ. ३१२-६

३१) भिमराव कुलकर्णी, उपरोक्त, पृ. ७९

३२) कित्ता, पृ. ८०

३३) म.री., खंड १, पृ. ३१८

३४) भिमराव कुलकर्णी, उपरोक्त पृ. ८४

३५) बेंद्रे, उपरोक्त, पृ. ९८६

३६) आपटे, शिवचरित्र प्रदिप, पुणे १९२५, पृ. ३०-१

३७) Dr.Muddachari, Op.Cit.,

३८) कमल गोखले, शिवपुत्र संभाजी, पुणे १९७१, पृ. ३२४

३९) म.री., खंड २, पृ. १०३

४०) Dr.Muddachari, Op.Cit., p. 102
शिवचरित्र वृत्त, खंड १, पृ. ३२

४१) कमल गोखले, उपरोक्त, पृ. ३२८

४२) Dr.Muddachari, Op.Cit., p. 108

४३) शिवचरित्र वृत्त संग्रह, खंड १, पृ. ३०

४४) कित्ता, पृ. २९

४५) शिवचरित्र प्रदिप, पृ. ३३-३४

४६) कमल गोखले, उपरोक्त, पृ. ३४१-४२

४७) वा.सी.बेंद्रे, छ.संभाजी महाराज, पुणे १९६०, पृ. ४८३

४८) के.एन.चिटणीस - जयसिंगराव पवार संपादित, संभाजी स्मारक ग्रंथ, पृ. ४८८

४९) अ.रा.कुलकर्णी आणि ग.ह.खरे (सं.), मराठ्यांचा इतिहास, खंड १, पृ. ४८३

५०) डॉ.आप्पासाहेब पवार (सं.), ता.का., खंड १, पृ. ४७३

५१) याविषयी मतभेद दिसतात.

५२) कुलकर्णी आणि खरे, उपरोक्त, पृ. ४८५

५३) सेतुमाध्वराव पगडी, मो.म.,पृ. १०३

पगडी, म.स्वा.यु., पृ. २६

५४) पगडी, मो.म., पृ.११५

५५) कित्ता, पृ. ११७

५६) स.मा.गर्गे, कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास, पुणे १९७४, पृ. ५३

५७) पगडी, मो.म, पृ. १२०

५८) पगडी, म.स्वा.यु., पृ. २६

५९) Setu Madhavrao Pagadi, Maratha Mughal Relation, p. 91

६०) स.मा.गर्गे, उपरोक्त, पृ. ५७-६७

६१) कुलकर्णी-खरे, उपरोक्त, पृ. ४७५

६२) जयसिंगराव पवार, उपरोक्त, पृ. ३७०

६३) पगडी, मो.म., पृ. १७३

६४) कित्ता, पृ. १७४

६५) असे होते मोगल, पृ. ३९१

६६) पगडी, म.औ., पृ. १८४

६७) कित्ता, पृ. १२४-७

६८) पगडी, मो.म., पृ. १८४

६९) जयसिंगराव पवार, उपरोक्त, पृ. ३७८

७०) राजवाडे, म.इ.सा., खंड ३, पृ. ५३

७१) ग.ह.खरे, निवडक लेख, पृ. १२८

७२) राजवाडे, उपरोक्त, खंड २, पृ. ५३

७३) खरे, उपरोक्त, पृ १२८

७४) कित्ता, पृ. १२९

७५) राजवाडे, उपरोक्त, खंड २, पृ. ५३

७६) म.री., खंड ३, पृ. २७७

७७) खरे, उपरोक्त, पृ. १३०

७८) वि.गो.खोबरेकर, मराठ्यांचा इतिहास, खंड २, पृ. ८१

७९) ग.ह.खरे, उपरोक्त, पृ. १३१

८०) म.री.खंड ३, पृ. २७७-९

८१) ग.ह.खरे, उपरोक्त, पृ. १३१

८२) खोबरेकर, उपरोक्त, पृ. २१९